मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र.- II मध्ये

(वित्तीय मंत्रालय)
३रा मजला, टेलिफोन भवन, स्ट्रॅण्ड रोड, कुलाबा,
मुंबई - ४०० ००५.
मूळ अर्ज क्र. १४२० सन २०२४

नि. क्र.: ११

बँक ऑफ बडोदा ....अर्जदार
विरुद्ध
संगिता चंदेले आणि अन्य ....प्रतिवादी

समन्स

ज्याअर्थी, वरील नमूद **ओ. ए. क्र. १४२० सन २०२३** सन्माननीय पीठासिन अधिकाऱ्यांसमोर ०३/०४/२५ रोजी सूचीबद्ध केला होता.

ज्याअर्थी, सन्माननीय न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. ३४,९५,३७८.८३ (रूपये चौतीस लाख पंच्याण्णव हजार तीनशे अठ्ठ्याहत्तर आणि त्र्याऐंशी मात्र)** च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जारी केली. (जोडलेल्या दस्तावेजांच्या प्रतींसह अर्ज).

ज्याअर्थी साधारण स्वरुपात समन्सची बजावणी परिणामकारक झालेली नाही आणि ज्याअर्थी सन्माननिय न्यायाधिकरणाद्वारे पर्यायी बजावणीकरिता अर्ज संमत करण्यात आला आहे.

ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(i) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या ३० (तीस) दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;

(ii) मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;

(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.

(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करार नाहीत.

(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.

(vi) तुम्हाला सदर डीआरटी II व्यक्तिशः वा वकिलाद्वारे लेखी विवरणपत्र/म्हणणे दाखल करण्यासाठी आणि विनंतीप्रमाणे अनुतोष का मंजूर करु नये याची कारणे दर्शविण्यासाठी **२९/०१/२०२६ रोजी स. ११.०० वा.** उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत. नोंद घ्यावी की, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या २६ सप्टेंबर, २०२५ रोजी दिले.

शिक्का

प्रबंधक
डीआरटी- II, मुंबई

प्रतिवादींचे नाव आणि पत्ता.
प्रति,
१. सुश्री. संगिता अनिल चंदेले (प्रतिवादी क्र. १)
त्यांचा पत्ता येथे: फ्लॅट क्र. २०१, २रा मजला, लक्ष्मी व्हिजन सीएचएस लि., विजय पार्क, मीरा रोड, ठाणे (पूर्व), महाराष्ट्र- ४०१ १०७
तसेच येथे
फ्लॅट क्र.४०५, ४था मजला, जी विंग, अघाव रेसिडेंसी, आटगाव, शहापूर, ठाणे- ४२१ ६०१
तसेच येथे
फ्लॅट क्र.४०६, ४था मजला, जी विंग, अघाव रेसिडेंसी, आटगाव, शहापूर, ठाणे- ४२१ ६०१
२. सुश्री. मानसी अनिल चंदेले (प्रतिवादी क्र. २)
त्यांचा पत्ता येथे: फ्लॅट क्र. २०१, २रा मजला, लक्ष्मी व्हिजन सीएचएस लि., विजय पार्क, मीरा रोड, ठाणे (पूर्व), महाराष्ट्र- ४०१ १०७
तसेच येथे
फ्लॅट क्र.४०५, ४था मजला, जी विंग, अघाव रेसिडेंसी, आटगाव, शहापूर, ठाणे- ४२१ ६०१
तसेच येथे
फ्लॅट क्र.४०६, ४था मजला, जी विंग, अघाव रेसिडेंसी, आटगाव, शहापूर, ठाणे- ४२१ ६०१

फॉर्म ए
जाहीर उद्घोषणा
(इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (इन्सॉल्व्हन्सी रिझॉल्युशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ६ अन्वये)

वाईड वर्ल्ड (इंडिया) इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंच्या माहीतीकरीता

संबंधित तपशील

१	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	**वाईड वर्ल्ड (इंडिया) इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड**
२	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख	१८/१०/२०२५
३	कॉर्पोरेट कर्जदार ज्या अंतर्गत स्थापित/ नोंदणीकृत आहे ते प्राधिकरण	आरओसी - मुंबई
४	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर/ लिमिटेड लायाबिलिटी आयडेन्टिफिकेशन नंबर	यु४५२००एमएच२००५पीटीसी१५६८१९
५	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालय (असल्यास) ह्यांचा पत्ता	एनरकॉन टॉवर, प्लॉट क्र. ९-ए, वीरा इंडस्ट्रियल इस्टेट, वीरा देसाई रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००५३
६	कॉर्पोरेट कर्जदाराच्या बाबतीत नादारी सुरू होण्याची तारीख	सीआयआरपी आदेश दिनांक ०७.१०.२०२५ रोजी घोषित करण्यात आला. आदेश प्राप्त/संपर्क दिनांक ०७.१०.२०२५ रोजीस.
७	नादारी निर्णय प्रक्रिया समाप्तीची अंदाजित तारीख	०५.०४.२०२६ (सीआयआरपी आदेशाच्या तारखेपासून १८० दिवस)
८	अंतरिम निर्णय व्यावसायिक म्हणून कृती करणाऱ्या नादारी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक	**नाव - आयपी मेघा अग्रवाल** **नोंदणी क्रमांक -** आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०१४५६/२०१८-१९/१२२७२
९	बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम निर्णय व्यावसायिकांचा पत्ता आणि ई-मेल	पत्ता - ००१, काँग्रेस नगर गार्डनच्या सर्कलमधील शिवरंजिनी अपार्टमेंट्स, काँग्रेस नगर, नागपूर -४४००१२ (एम. एस.) ईमेल: ip.meghaagrawal@gmail.com
१०	अंतरिम निर्णय व्यावसायिकांशी दळणवळण करण्याकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल	पत्ता: प्लॉट क्र. ७२, अंजनय निवास, ड्यू आणि ट्रिनिटी हॉस्पिटलसमोर, हिंदुस्थान कॉलनी, वर्धा रोड, नागपूर ४४००१५ (एम. एस.) ईमेल: wwiipl.cirp@gmail.com
११	दावे सादर करण्यासाठी अंतिम तारीख	**२१.१०.२०२५**
१२	अंतरिम निर्णय व्यावसायिकांनी निश्चित केलेले कलम २१ च्या पोट-कलम (६ ए) च्या खंड (बी) अंतर्गत धनकोंचे वर्ग, असल्यास	प्रयोज्य नाही
१३	एका वर्गातील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून कृती करण्यासाठी ठरलेल्या नादारी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे)	प्रयोज्य नाही
१४	(ए) संबंधित फॉर्म्स आणि (बी) प्राधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत:	ए) वेबलिंक: https://ibbi.gov.in//en/home/download बी) प्रयोज्य नाही

याद्वारे सूचना देण्यांत येते की, राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण यांनी **०७.१०.२०२५** रोजीस **वाईड वर्ल्ड (इंडिया) इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड**ची एक कॉर्पोरेट नादारी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले.

वाईड वर्ल्ड (इंडिया) इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे नोंद क्र. १० समोरील पत्त्यावर अंतरिम निराकरण व्यावसायिकांकडे **२१.१०.२०२५** रोजी किंवा त्यापूर्वी त्यांच्या दाव्यांचे पुरावे सादर करण्यास सांगण्यात येते.

वित्तीय धनकोंनी फक्त इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्यांच्या दाव्यांचा पुरावा सादर करावा. अन्य सर्व धनको व्यक्तीशः टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पुराव्यासह दावे सादर करू शकतात.

नोंद क्र. १२ समोर सूचिबद्ध केल्याप्रमाणे एखाद्या वर्गातील वित्तीय धनकोंनी फॉर्म सीए मधील वर्गाचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून कृती करण्याकरिता फॉर्म सीए मध्ये नोंद क्र. १३ समोर सूचिबद्ध केलेल्या तीन नादार व्यावसायिकांमधून प्राधिकृत प्रतिनिधींची त्यांची पसंती कळवावी.

दाव्यांच्या खोटी किंवा दिशाभूल करणारे पुराव्यांच्या सादरीकरण दंडास पात्र असेल.

सही/-
आयपी मेघा अग्रवाल
अंतरीम रिझोल्युशन प्रोफेशनल
दिनांक : ०९.१०.२०२५ आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०१४५६/२०१८-१९/१२२७२
ठिकाण : मुंबई एएफए ३१.१२.२५ पर्यंत वैध्य

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्यांना कळविण्यात येते की, श्री. दिलीप कुमार ओस्वाल (मृत) हे खालील मालमत्तेचे संयुक्त मालक (५०% हिस्सा) होते - फ्लॅट क्रमांक १७०१, १७ वा मजला, टॉवर क्रमांक १, ओकवुड, रनवाल ओकवुड सीएचएसएल, रनवाल ग्रीन्स, स्थान : भांडूप (पश्चिम), मुंबई, आणि कार पार्किंग क्रमांक पी४-५६२ (यापुढे ''सदर मालमत्ता'' म्हणून ओळखली जाते.) सदर मृत व्यक्तीचे कायदेशीर वारस पुढीलप्रमाणे आहेत:- सौ. किरण देवी ओस्वाल (पत्नी), श्री. भरत कुमार ओस्वाल (पुत्र), आणि सौ. भाग्यश्री जैन (पूर्वाश्रमी सुश्री भाग्यश्री दिलीप ओस्वाल) (कन्या). वरील सर्व वारसांपैकी श्रीमती किरण देवी ओस्वाल आणि सुश्री भाग्यश्री जैन यांनी त्यांच्या प्रत्येकी १/३ हिस्सा (एकूण ५०% अविभाजित मालकीतील हिस्सा), जो त्यांना दिवंगत श्री. दिलीप कुमार ओस्वाल यांच्या वारसाहक्कातून प्राप्त झाला होता, तो श्री. भरत कुमार ओस्वाल यांच्या नावावर सोडलेला आहे. जर कोणत्याही व्यक्तीस सदर मालमत्तेबाबत, किंवा या सोडलेल्या हिस्स्याबाबत, कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा किंवा हरकत असल्यास, त्यांनी त्या संदर्भातील पुरावे जोडून, या जाहीर सूचनेच्या प्रकाशन दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे:- पत्ता: जी-०१, मखान धाम, ११वा रोड, पी.डी. हिंदुजा हॉस्पिटल (खार) जवळ, खार (पश्चिम), मुंबई - ४०००५२. जर नमूद कालावधीत कोणताही दावा प्राप्त झाला नाही, तर असा समज करण्यात येईल की, कोणताही वैध दावा अस्तित्वात नाही किंवा सर्व दावे त्यागलेले आहेत, आणि व्यवहार लागू कायद्यानुसार पुढे चालविला जाईल. कृपया नोंद घ्यावी की, फक्त लेखी आणि पुराव्यांसह प्राप्त झालेले दावेच ग्राह्य धरले जातील.

आनंद नागवेकर
सही/-
दिनांक : ०९ ऑक्टोबर २०२५ अॅडव्होकेट

परिशिष्ट IV-A
स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम 2002 चा नियम 8(6)च्या नियमांना सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अन्वये स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी **ई-लिलावाची विक्री सूचना.**

सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदारांना तसेच हमीदारांना सूचीत करण्यात येते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदात्यांनी गहाण केली गेली होती त्या मालमत्तेवर सुरक्षित कर्जदात्याच्या प्राधिकृत अधिकारीने **सम्मान कॅपिटल लिमिटेड (पूर्वी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून ओळखले जायचे) [CIN : L65922DL2005PLC136029] (''सुरक्षित कर्जदार'')** तर्फे **वास्तविक ताबा** घेतला आहे. ज्याचा **10.11.2025** रोजी **संध्याकाळी 05.00 ते 06.00** पर्यंत **''जेथे आहे'', ''जसे आहे'' आणि ''जे काहीपण आहे''**, ची वसूली साठी **कर्ज खाते नं. HHLVSH00393645** साठी **रु. 37,53,874/-(रुपये सदतीस लाख त्रेपन्न हजार आठशे चौऱ्याहत्तर फक्त)** उर्वरित मूलधन, उर्वरित (विलंबशुल्क) आणि दिनांक **29.09.2025** पर्यंत व्याज कर्जाच्या अटींनुसार कर्ज करार आणि इतर संबंधित कर्ज दस्तऐवजांच्या संदर्भात लागू भविष्यातील व्याज **30.09.2025** पासून कायदेशीर खर्च किंवा इतर शुल्का सह प्रभावी होऊन जो **फरहान कुरेशी आणि रेहाना फरहान कुरेशी** यांची मालमत्ता सुरक्षित कर्जदाराच्या द्वारे कर्जाच्या वसूली साठी विकली जाईल.

सदर मालमत्तेच्या लिलावासाठी आरक्षित रक्कम **रु. 16,40,000/-(रुपये सोळा लाख चाळीस हजार फक्त)** आणि अर्नेस्ट मनी डिपॉजिट **(''ईएमडी'') रु. 1,64,000/-(रुपये एक लाख चौसष्ठ हजार फक्त)** म्हणजेच अनामत ठेव रक्कम राखीव किंमतीच्या 10% असेल.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

1 बीएचके फ्लॅट क्र. 404, चौथ्या मजल्यावर, बिल्डिंग ''बी8'', 31.48 मोजमापाचे कार्पेट क्षेत्र, ''अरिहंत आर्शिया'' मध्ये, दहिवली गावात स्थित, तालुका खालापूर, जिल्हा रायगड-400707, महाराष्ट्र.

विक्रीच्या तपशीलवार नियम व अटींसाठी कृपया सुरक्षित कर्जदाराच्या www.sammaancapital.com या वेबसाईटवरील लिंक पाहा; संपर्क क्र. : 0124-6910910, +91 7065451024, ई-मेल : auctionhelpline@sammaancapital.com. बोली लावण्यासाठी, www.auctionfocus.in वर लॉग ऑन करा.

सही/-
अधिकृत अधिकारी
तारीख : 29.09.2025 **सम्मान कॅपिटल लिमिटेड**
स्थळ : रायगड **(पूर्वी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून ओळखले जायचे)**

कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र.II, मुंबई येथे

वित्त मंत्रालय, भारत सरकार
३रा मजला, एमटीएनएल भवन, स्ट्रँड रोड, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई-४०००५.

मागणी सूचना

द रिकव्हरी ऑफ डेब्टस अँड बँक्रप्ट्सी ॲक्ट, १९९३ ची कलम २५ ते २८ आणि आयकर अधिनियम, १९६१ च्या नियम २ अन्वये सूचना.

आर. पी. क्र. ८९ सन २०२४ परि. क्र. : ५
पुढील तारीख : ०७.११.२०२५

बँक ऑफ इंडिया
विरुध्द
मे. अनिता एम्ब्रॉयडरी एंटरप्रायझेस आणि इतर.

प्रति,
सीडी १. मे. अनिता एम्ब्रॉयडरी एंटरप्रायझेस एकमेव मालकी हक्काचा व्यवसाय, मालक सुश्री अनिता घनश्याम श्रीवास्तव पत्ता त्याचा असा : १२१ (दक्षिण), एटूझेड इंडस्ट्रियल इस्टेट, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०००१३.
सीडी २. सुश्री अनिता घनश्याम श्रीवास्तव, मे. अनिता एम्ब्रॉयडरी एंटरप्राइझेस एकमेव मालकी हक्काचा व्यवसाय, ज्याचा पत्ता १२१ (दक्षिण), एटोझेड इंडस्ट्रियल इस्टेट, गणपत राव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०००१३ येथे आहे.

याद्वारे अधिसूचित करण्यांत येते की, तुमच्याकडून **ओ. ए. क्र. १०३ सन २०२२** मध्ये सन्माननिय पीठासिन अधिकारी, **कर्ज वसूली न्यायाधिकरण II मुंबई**, यांनी पारित केलेल्या आदेशाने जारी केलेल्या वसुली प्रमाणपत्रानुसार **रु. ५७,१५,१५६/- (रुपये सत्तावन्न लाख पंधरा हजार एकशे छप्पन मात्र)** ची रक्कम देय झाले आहेत. अर्जदार अर्ज सादर **१६.११.२०१८** तारखेपासून संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे **प्रमाणपत्र देणाऱ्या कर्जदारांकडून** वसूल होईपर्यंत दरवर्षी @ **११.६%** दराने भविष्यातील व्याजासहे **रु. ५७,१५,१५६/- (रुपये सत्तावन्न लाख पंधरा हजार एकशे छप्पन मात्र)** खर्चासह वसुली वार्षिक व्याज दराने भविष्यातील व्याज सी.डी. यांच्याकडून वसुली करण्यास हक्कदार आहे.

तुम्हाला याद्वारे ह्या सूचनेच्या प्राप्तीच्या **१५ दिवसांत** वरील रकम प्रदान करण्याचे निर्देश देण्यात येते आहेत, कसूर केल्यास, रिकव्हरी ऑफ डेब्टस ड्यु टु बँक्स अँड फायनान्शिअल इन्स्टिट्युशन्स ॲक्ट, १९९३ व त्या अंतर्गत बनवलेले नियम यांच्या अनुषंगाने वसुली केली जाईल.

वरील रकमे व्यतिरिक्त तुम्हाला खालील रकमा सुद्धा भराव्या लागतील:
(ए) प्रमाणपत्र/निष्पादन प्रक्रियेच्या द्वा सूचनेनंतर तात्काळ सुरू होणाऱ्या कालावधी साठी देय असे व्याज
(बी) ही सूचना आणि वॉरंटस् च्या बजावणीच्या व थकबाकी रकमेच्या वसुलीकरिता केलेल्या अन्य सर्व उपाययोजनांच्या संबंधात आलेले सर्व खर्च, आकार आणि परिव्यय.

पुढील कार्यवाहीसाठी **०७.११.२०२५ रोजी दु. १२.०५ वा.** निम्नस्वाक्षरीकारांसमोर हजर होण्याचे आदेश याद्वारे तुम्हाला देण्यात येतात.

माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या **२ जुलै, २०२५** रोजी दिले.

सही/-
(भविष्य कुमार आझाद)
शिक्का **वसुली अधिकारी, डीआरटी-II, मुंबई.**

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्यांना कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. राजकुमार रामचंद लुधानी आणि श्रीमती सोनी राजकुमार लुधानी, राहणार फ्लॅट क्र. ११०१ ते ११०४, ११ वा मजला, इव्हरशाईन ज्वेल, १५ वा रोड, खार (पश्चिम), मुंबई -४०००५२, यांच्या खाली नमूद मालमत्तेवरील हक्क व स्वामित्वाची तपासणी आम्ही करीत आहोत (यापुढे **''सदर मालमत्ता''** म्हणून उल्लेखित).

जर कोणत्याही व्यक्तीस या मालमत्तेबाबत विक्री, अदलाबदल, तारण, देणगी, कब्जा, वारसा, ट्रस्ट, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, दायित्व, करार, भागीदारी, कौटुंबिक समायोजन, न्यायालयीन आदेश किंवा इतर कोणत्याही प्रकारचा दावा/हक्क/हरकत असल्यास, त्यांनी आवश्यक पुरावे आणि कागदपत्रांसह लेखी स्वरूपात या सूचनेच्या प्रकाशन दिनांकापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्यांस कळवावे. जर नमूद कालावधीत कोणतीही हरकत प्राप्त झाली नाही तर असा समज केला जाईल की, सर्व दावे त्यागले गेले आहेत आणि व्यवहार कोणत्याही हरकतीशिवाय पूर्ण करण्यात येईल.

पहिले परिशिष्ट

१. फ्लॅट क्र. ११०१, क्षेत्रफळ ९७१.८८ चौ. फु. (९०.२९ चौ. मी.) कार्पेट एरिया, ११ वा मजला, इमारत ''इव्हरशाईन ज्वेल'', शेअर प्रमाणपत्र क्र. २७, शेअर क्रमांक २०१ ते २०५, इव्हरशाईन ज्वेल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडमध्ये.

२. फ्लॅट क्र. ११०२, क्षेत्रफळ ८३३.४५ चौ. फु. (७७.४३ चौ. मी.) कार्पेट एरिया, ११ वा मजला, इमारत ''इव्हरशाईन ज्वेल'', शेअर प्रमाणपत्र क्र. २८, शेअर क्रमांक २०६ ते २१०, इव्हरशाईन ज्वेल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडमध्ये.

३. फ्लॅट क्र. ११०३, क्षेत्रफळ ४५६.०७ चौ. फु. (४२.३७ चौ. मी.) कार्पेट एरिया, ११ वा मजला, इमारत ''इव्हरशाईन ज्वेल'', शेअर प्रमाणपत्र क्र. २९, शेअर क्रमांक २११ ते २१५, इव्हरशाईन ज्वेल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडमध्ये.

४. फ्लॅट क्र. ११०४, क्षेत्रफळ ११६४.०१ चौ. फु. (१०८.१४ चौ. मी.) कार्पेट एरिया, ११ वा मजला, इमारत ''इव्हरशाईन ज्वेल'', शेअर प्रमाणपत्र क्र. ३०, शेअर क्रमांक २१६ ते २२०, इव्हरशाईन ज्वेल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडमध्ये.

वरील चार फ्लॅट्स (११०१, ११०२, ११०३ आणि ११०४) एकत्र करून एकच निवासी अपार्टमेंट तयार केलेले असून त्याचा क्रमांक फ्लॅट क्र. ११०१ असा आहे. ही मालमत्ता १५वा रोड, खार (पश्चिम), मुंबई-४०००५२ येथे स्थित असून, तिच्यावर नगरपलिका एच/डब्ल्यू वॉर्ड क्र.४५६१-६२, ४२५-४२६ वॉर्ड खाते क्र. एचडब्ल्यू २६००९७००१००१९ अंतर्गत कर लागू आहे. चार कार पार्किंग स्थाने क्रमांक ०१, ११, १२ आणि १३ (स्टिल्टखाली) आणि एक कार पार्किंग क्र. २९ (बेसमेंटमध्ये) सदर इमारतीत उपलब्ध आहेत. ही इमारत इव्हरशाईन ज्वेल, जमीन सिटी सर्व्हे क्र./३०९ आणि ई/३१०, बांद्रा पश्चिम, मुंबई उपनगर जिल्हा, १५ वा रोड, खार (पश्चिम), मुंबई-४०००५२ येथे आहे.

दुसरे परिशिष्ट

सदर मालमत्ता खार (पश्चिम) येथील जमीन, १५ वा रोड, गाव दांडा, तालुका व जिल्हा मुंबई उपनगर, नोंदणी उपजिल्हा बांद्रा, जमिनीचे एकूण क्षेत्रफळ १८३६.९१ चौ. मी., सुबर्बन स्कीम क्रमांक ७, प्लॉट क्रमांक ४२५ व ४२६, आता शहर सर्व्हे क्र. ई/३०९ व ई/३१० म्हणून ओळखले जाते. सीमारेषा पुढीलप्रमाणे आहेत:

उत्तरेस : प्लॉट क्रमांक ४२५
दक्षिणेस : प्लॉट क्रमांक ४२७
पूर्वेस : काही भाग प्लॉट ४४० आणि काही भाग प्लॉट ४३९
पश्चिमेस : सदर योजनेचा १५वा रस्ता

दिनांक : ०९ ऑक्टोबर २०२५ सॉलोमन अँड कंपनी
(जे. एस. सॉलोमन)
भागीदार अधिवक्ता आणि सॉलिसिटर
कार्यालय पत्ता: कॅलकॉट हाऊस, तिसरा मजला, ८/१०, एम. पी. शेट्टी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०००२३
ईमेल-jonathan.solomon@slmnco.in

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

नोंद. कार्यालय : २७ बीकेसी, सी २७, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पू.), मुंबई- ४०० ०५१.
कॉर्पोरेट कार्यालय : कोटक इन्फिनिटी, बिल्डिंग क्र. २१, इन्फिनिटी पार्क, जनरल ए. के. वैद्य मार्ग, मालाड (पू.), मुंबई- ४०००९७. www.kotak.com

लिलाव-सूचना

खालील नमूद कर्जदारांनी खाली विनिर्दिष्ट केल्यानुसार सोने दागिने/वस्तु गहाण ठेवून सोने कर्ज सुविधा घेतली आहे. कर्जदारांनी हप्ते आणि थकबाकी रकमेची परतफेड करण्यास कसूर केलेली आहे आणि त्यामुळे बँकेला थकीत रकमांची परतफेड करण्यासाठी कर्जदारांना बोलाविण्याकरिता सूचना जारी करणे भाग पडले. तथापि, कर्जदार त्यांची उर्वरित थकबाकीची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्यामुळे बँकेच्या नावे तारण ठेवलेल्या सोने दागिन्यांचा लिलाव करणे बँकेला भाग पडत आहे.

वर वर्णन केलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा खुला लिलाव येथे करण्यात येईल :-
दिनांक: १८-ऑक्टोबर-२०२५ वेळ: ११:०० सकाळी ठिकाण: संबंधित उप-स्थाने/ई-लिलाव

एपीपी/एपीएसी	पक्षकाराचे नाव	राज्य	ठिकाण	उप ठिकाण	ढोबळ वजन
जीएलएन४०२४९८९	करुणा विलास वाघमारे	महाराष्ट्र	नवी मुंबई	कळंबोली	३२.५४
जीएलएन३७५८४३१	कलीम अहमद	महाराष्ट्र	नवी मुंबई	कळंबोली	१७.७५
जीएलएन३७६९९८०	कलीम अहमद	महाराष्ट्र	नवी मुंबई	कळंबोली	२९.२२
जीएलएन३९९६६३२	विजय हरिला ल्याडव	महाराष्ट्र	नवी मुंबई	नेरुळ	९७.५३
जीएलएन३९७६३७६	सिद्धेश एकनाथ भागवत	महाराष्ट्र	नवी मुंबई	नेरुळ	७२.१३
जीएलएन३८९१०९२	सिद्धेश एकनाथ भागवत	महाराष्ट्र	नवी मुंबई	नेरुळ	७.६२
जीएलएन३७८९६३३	सिद्धेश एकनाथ भागवत	महाराष्ट्र	नवी मुंबई	नेरुळ	११.८८
जीएलएन३५९१५६७	जितेंद्र दळवी	महाराष्ट्र	नवी मुंबई	पनवेल	४५.८०
जीएलएन४०१०५४९	समीर सीताराम म्हस्कर	महाराष्ट्र	नवी मुंबई	पनवेल	४०.३२
जीएलएन३६८९७२०	चेतन बजाबा पोखरकर	महाराष्ट्र	नवी मुंबई	वाशी	१३.६८
जीएलएन३५०३४००	सावित्रा राजाराम वाशिवाले	महाराष्ट्र	नवी मुंबई	वाशी	१०३.४३
जीएलएन३५०४०४४	सावित्रा राजाराम वाशिवाले	महाराष्ट्र	नवी मुंबई	वाशी	१७.९०

बोलीदारांना त्यांचे मूळ छायांकित-ओळखपत्र, स्वाक्षरी आणि पत्त्याचा पुरावा त्यासह दोन सध्याचे फोटोग्राफ्स सादर करण्याची विनंती करण्यात येत आहे. कायदपत्र हस्तांतरणासाठी वैयक्तीक बोलीदारांनी सुद्धा उपस्थित रहावे. बँक बोलीदारांस कोणतीही सूचना न देता लिलावाचे ठिकाण/तारीख/वेळ बदलण्याचे वा लिलाव रद्द/उच्चतम बोली अंतिम करण्याचे प्राधिकार राखून ठेवत आहेत.

ग्राहकाच्या खात्यांमधून लिलावाच्या प्रक्रियेची रक्कम घेतली जाईल. बोलीची रक्कम खातेदाराच्या खात्यातील रकमेच्या आसपास नसल्यास सदर रक्कम ग्राहकाच्या बोलीतून घेण्याचे अधिकार बँकेकडे राखून ठेवले जातील.

लिलावाच्या अटी आणि शर्तींसंबंधी कोणत्याही पुढील तपशील/सहाय्य/स्पष्टीकरणाकरिता, तुम्ही **श्री. राकेश जयस्वार-९९२६०५१४१४** येथे संपर्क साधणे आवश्यक आहे.

SBI State Bank of India

शाखा-एसएआरबी ठाणे (११६९७): १ला मजला, केरोम बिल्डिंग, प्लॉट क्र. ११२, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट,

जोडपत्र - IV-ए (नियम ८(६) चे परंतुक पहा)

स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या परंतुकासह वाचत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसामान्य जनता आणि विशेषकरून कर्जदार आणि हमीदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, स्टेट बँक ऑफ इंडिया, तारणी धनको यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **प्रत्यक्ष कब्जात** घेतलेल्या तारणी धनकोंकडे गहाण/भारग्रस्त असलेली खाली वर्णन केलेली स्थावर मिळकत **श्री. अजयकुमार फुलचंद विश्वकर्मा आणि श्री. फुलचंद तुलसीराम विश्वकर्मा** यांच्याकडून तारणी धनकोंना येणे थकबाकी असलेल्या **०७.०९.२०२३ रोजीसप्रमाणे रु. ३१,६६,२५०.००** (रुपये एकतीस लाख सहासष्ट हजार दोनशे पन्नास मात्र) सह त्यावरील पुढील व्याज, आनुषंगिक खर्च आणि परिव्ययाच्या वसुलीसाठी **३१.१०.२०२५ रोजीस** ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' **तत्वावर विकली जाईल. राखीव किंमत रु. २२,००,०००/- (रुपये बावीस लाख मात्र) आणि इसारा अनामत रक्कम रु. २,२०,०००/- (रुपये दोन लाख वीस हजार मात्र) असेल.**

इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्याआधी लिलावात ठेवलेल्या मिळकतींवरील भार, त्यांचे मालकी हक्क आणि मिळकतीला बाधा आणणाऱ्या दावे/अधिकार/सोसायटी/ थकबाकीबाबत त्यांची स्वतंत्र चौकशी करून घ्यावी. ई-लिलावाची जाहिरात म्हणजे बँकेकडून कोणतेही वचन किंवा कोणतेही सांगणे असल्याचा अर्थ काढू नये किंवा तसा समज करून घेऊ नये.

**बोलीदारांनी लिलाव तारखेपूर्वी मे. पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड ने अवलंब केलेल्या पध्दतीनुसार आवश्यक केवायसी दस्तावेज आणि नोंदणी शुल्क प्रदान करून https